आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ मे २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

- मेक इन इंडिया हे निर्णायक धोरण असून त्यामुळे भारत भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असा संरक्षण मंत्र्यांचा विश्वास

- आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारतीय ॲथलेटिक्स संघाला मिश्र रिले स्पर्धेत सुवर्णपदक

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात लढत होणार

**<><><><>**

भारतीय अर्थव्यवस्था गॅस आधारित अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने प्रगती करत असून, पर्यावरण रक्षणासाठी ते पूरक ठरेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज पश्चिम बंगालमध्ये अलीपुरद्वार जिल्ह्यात शहर आधारित गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी करताना बोलत होते. या प्रकल्पासाठी १ हजार १७ कोटी रुपये खर्च झाले असून, पश्चिम बंगालमधल्या अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यातल्या नागरिकांना त्याचा लाभ मिळेल. या प्रकल्पातून घरोघरी स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा होईल.

विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- होल्ड बाईट- प्रधानमंत्री -**

प्रधानमंत्री मोदी यांनी आज सकाळी दूरस्थ पद्धतीनं सिक्कीम मधल्या विविध विकास प्रकल्पांचं उदघाटन आणि पायाभरणी केली. सिक्कीम सह ईशान्येकडचा संपूर्ण प्रदेश भारताच्या प्रगतीचा तेजस्वी अध्याय म्हणून उदयाला येत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री मोदी आज संध्याकाळी बिहारला भेट देणार असून, पाटणा विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन करतील. उद्या कराकट इथं ते विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण करतील. त्यानंतर ते उत्तर प्रदेशला भेट देणार असून, कानपूर नगर इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<><><>**

डोंगराळ प्रदेशांमध्ये दरड कोसळण्याच्या घटना कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज आहे असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वागतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. डोंगर उतारांचे स्थिरीकरण आणि दरडी कोसळ्यास प्रतिबंध या विषयावर नवी दिल्लीत झालेल्या परिषदेला ते संबोधित करत होते. तंत्रज्ञानातली प्रगती ही प्रवाही गोष्ट आहे आणि तज्ञांनी समस्या ओळखून योग्य उपाययोजना सुचवली पाहिजे असंही त्यांनी सांगितलं.

**<><><>**

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार ८७५ कोटी इतकी विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. ही गुंतवणूक देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. त्याआधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही गुंतवणूक ३२ टक्के अधिक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटी इतकी परकीय गुंतवणूक आली. राज्याच्या घोडदौडी अशीच सुरू राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या जनतेचं अभिनंदनही केलं.

**<><><>**

संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या बैठकीचं उद्घाटन आज परभणीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झालं. वातावरण बदलामुळे शेती पारंपरिक पद्धतीने करता येत नाही तिच्यात गुंतवणूक होणं आवश्यक आहे, मात्र ७९ टक्के शेतकरी अल्पभूधारक असल्याने त्याच्यात गुंतवणूक करण्याची क्षमता नाही. अशा दुष्टचक्रात शेतकरी अडकल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या दुष्टचक्रामधून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी योजना आखून सरकार प्रयत्न करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी आज राजभवन इथं महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. त्यावेळी राजभवनातले अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस दलातले अधिकारी तसंच कर्मचारी उपस्थित होते.

<><><><>

मेक इन इंडिया हे देशासाठी निर्णायक धोरण असून, जपान प्रमाणे, भारतही भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. देशाची सुरक्षा आणि समृद्धीसाठी 'मेक इन इंडिया' महत्वाचं असून ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशवासीयांनी या मोहिमेचं यश अनुभवल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत आज केवळ लढाऊ विमानं किंवा क्षेपणास्त्र प्रणाली बनवत नसून, नव्या युगाच्या युद्ध तंत्रज्ञानासाठी देखील सज्ज होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

भारतानं दहशतवादाविरोधातलं आपलं धोरण आणि प्रतिसाद नव्यानं परिभाषित केलं असून, पाकिस्तानला हे समजलं आहे की, दहशतवादाचा व्यवसाय चालवणं किफायतशीर नाही, कारण त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल, असं ते म्हणाले.

संपूर्ण जगात आज अनिश्चिततेचं वातावरण असून, विश्वासाचा अभाव हे त्याचं मूळ कारण आहे. या पार्श्वभूमीवर, देशाचे विविध प्रदेश, समुदाय आणि आर्थिक घटकांमध्ये

विश्वासाचं मजबूत वातावरण निर्माण करण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचं राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

**<><><>**

आयुष्मान भारत हा आरोग्य सेवा देणारा जगातला सर्वात मोठा कार्यक्रम असून देशातल्या जवळजवळ ६२ कोटी नागरिकांनी त्याचा लाभ घेतल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. आयुष्मान भारत योजनेची अंमलबजावणी झाल्यापासून आतापर्यंत ९ कोटी ४० लाख इतकी रुग्णालय भर्ती सेवा पुरवण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><>**

दक्षिण कोरियात गुमी इथं सुरु असलेल्या आशियाई अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारतीय अॅथलेटिक्स संघानं मिश्र रिले स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं. भारतीय संघाकडून रूपल चौधरी, संतोष कुमार तमिलारासन, विशाल टीके आणि सुभा वेंकटेशन यांनी चमकदार कामगिरी केली. भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. चीन दुसऱ्या तर श्रीलंका तिसऱ्या स्थानावर राहिला.

**<><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात लढत होणार आहे. पंजाब इथे महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियममध्ये संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

उद्या होणारा एलिमेनिटर सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात खेळवण्यात येणार आहे. तीन जून रोजी स्पर्धेचा अंतिम सामना आहे.

**<><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं आज उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी इंडोनेशियाच्या साबर कार्यमान गुटामा आणि मोह रेझा पेहलवी इस्फहानी या जोडीचा १९-२१, २१-१६, २१-१९ असा पराभव केला. पुढच्या फेरीत मलेशियाच्या बॅडमिंटनपटूंशी त्यांची गाठ पडेल.

**<><><><>**

**रत्नागिरी** जिल्ह्यात वातावरण ढगाळ असून अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत, मात्र जिल्ह्यात पावसाचा जोर आता ओसरल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. **छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यात आज सकाळपर्यंत १२ पूर्णांक ८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

**//<><><><>//**